दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक १८९ वा रविवार दि.२४ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## मराठ्यांची भूमिका कोर्ट ऐकणार : मुख्यमंत्री शिंदे



मुंबई : आताच सुप्रीम कोर्टाचा निर्णय झाला असून क्युरेटिव्ह पिटीशन २४ जानेवारीला कोर्ट ऐकणार आहे. ही याचिका फेटाळेल असे म्हटले जायचे. पण सुप्रीम कोर्ट हे ऐकणार आहे, त्यामुळे मराठा समाजासाठी मोठा दिलासा आहे. २४ जानेवारीला वकिलांची तज्ज्ञ फौज बाजू मांडेल, मराठा समाज मागास कसा आहे हे सांगेल, परिस्थिती सांगेल. सुप्रीम कोर्टाने ज्या त्रुटी मांडल्या होत्या, त्या दूर करण्याचे काम वकिलांची फौज करेल. मला वाटते मराठा सामाजाला न्याय मिळेल असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी मराठा आंदोलनाची पुढची दिशा जाहीर केली आहे. बीडमध्ये झालेल्या सभेत मनोज जरांगे यांनी येत्या २० जानेवारीपासून मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण करण्याची घोषणा केली. जरांगेंच्या या घोषणेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.मागच्या सरकारने मविआ सरकारने सुप्रीम कोर्टात मराठा समाजाला मागास ठरवण्यासाठी जे पुरावे द्यायला हवे होते ते मांडले नव्हते. पण यावेळी निष्णात वकिलांची फौज बाजू मांडेल. तोपर्यंत सर्वांनी शांतता राखणे आवश्यक आहे. कायदा सुव्यवस्थता, शांतता राहिली पाहिजे, सर्व जाती धर्मांना माझे आवाहन आहे, सर्वांनी संयम राखावा, मराठा समाजाला नक्की न्याय मिळेल. क्युरेटिव्ह पीटिशन ऐकली जाणं ही जमेची बाब आहे, मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही सर्वांची इच्छा आहे, सत्ताधारी, विरोधक, आंदोलक सर्वांना वाटतं मराठा आरक्षण मिळावे ही सर्वांची इच्छा आहे. सुप्रीम कोर्टात आम्ही बाजू मांडू, सर्वांनी शांतता राखावी, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## कायदा झुंडशाहीला बळी पडतोय का?



बीड : मनोज जरांगेच्या बीडमधील इशारा सभेच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने शहरातील सर्व शाळांना सुट्या देण्याचे आदेश काढले. दरम्यान, आता याच आदेशावरून मंत्री छगन भुजबळ यांनी संताप व्यक्त केला आहे. 'एका समाजातील काही ठराविक लोकांच्या दबावाला, झुंडशाहीला आपला कायदा, प्रशासन बळी पडतेय का? असे असेल तर हे निश्चितच लोकशाहीला धरून नाही,' असे भुजबळ यांनी म्हटले आहे.बीडच्या शिक्षण अधिकारी यांनी काढलेल्या आदेशाची प्रत ट्वीट करत भुजबळ यांनी म्हटले आहे की, 'कोणत्याही सभेसाठी शाळांना सुट्या जाहीर करण्याचे कारण काय?, कोणत्याही सभा, मेळावे यांबद्दल कोणाला आक्षेप असण्याचे काही कारण नाही. पण, त्यासाठी थेट शाळा बंद ठेवणे किंवा सुटी जाहीर करणे नक्कीच चुकीचे आहे.काही दिवसांपूर्वी जालना जिल्ह्यात होणार असलेल्या मनोज जरांगे यांच्या सभेमुळे जिल्हा परिषदेने आपल्या प्राथमिक शाळांना थेट सुटी जाहीर केल्याचे पत्रक काढले होते. त्याविरोधात आवाज उठविल्यानंतर रात्री उशिरा ती सुटीची सूचना मागे घेण्यात आली. त्याविरोधात मी जाहीर सभा, प्रसारमाध्यमे आणि विधानभवनातही आवाज उठवला होता. आता पुन्हा बीड जिल्ह्यात जरांगे यांच्या सभेसाठी बीड शहरातील सर्व माध्यमाच्या सर्व शाळा बंद ठेवण्याचे आदेश शिक्षणाधिका-यांकडून देण्यात आले असल्याचे भुजबळ म्हणाले.

## पानगाव - खरोळा फाटा रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात; आ. कराड यांचे आभार व्यक्त

लातूर दि.२३ :- पानगाव ते खरोळा पाटी या दरम्यानच्या रखडलेल्या राष्ट्रीय महामार्ग रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली. या कामासाठी वेळोवेळी पाठपुरावा केल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे पानगाव आणि परिसरातील अनेकांनी सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत. लातूर - बीड जिल्ह्याला जोडणाऱ्या धर्मापुरी ते पानगाव आणि खरोळा पाटी ते रेणापूर फाटा दरम्यानच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले मात्र खरोळा पाटी ते पानगाव १४.२ किमी लांबीचे काम रखडल्याने रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक झाला होता. रस्त्याची दुरावस्था आणि पानगाव व परिसरातील नागरिकांची मागणी लक्षात घेऊन भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांची भेट घेऊन सदरील रस्त्याचा प्रश्न गांभीर्याने घेऊन लवकरात लवकर निकाली काढण्याची मागणी केली असता मंत्री महोदयांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान काळात आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेळोवेळी संपर्क साधून लेखी तोंडी मागणी करून सातत्याने पाठपुरावा केला. यामुळे वर्षानुवर्ष रखडलेला पानगाव रस्त्याचा प्रश्न निकाली निघाला आणि कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने आ. रमेशआप्पा कराड यांचे भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष अँड.





दशरथ सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष सतीश आंबेकर, ललिता कांबळे, माजी उपसभापती अनंत चव्हाण, भाजयुमो तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, पानगाव शहराध्यक्ष गणेश तूरूप, रमाकांत संपत्ते, मारुती गालफाडे, सुरेंद्र हरिदास, दत्तात्रय भंडारे, अँड. माधव गुडे, संदीप साबदे, पप्पू शेंडगे, कार्तिक गंभीरे, दीपक कस्तुरे, दत्ता अहंकारे यांच्यासह अनेक जण होते.

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांची सभा संपन्न.




चिमुर: - स्वतंत्र मजदूर युनियनशी संलग्नित स्वतंत्र अंगणवाडी कर्मचारी संघटनेची सभा दिनांक २२ डिसेंबर २०२३ ला जिजाऊ बँक,डॉ.येवले चौक,चिमूर येथे स्वतंत्र अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्याअध्यक्षा मा.प्रफुलताताई लोणारे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.सदर सभेला स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्याचे सह सचिव मा. गणेश उके,स्वतंत्र समता शिक्षक संघाचे अध्यक्ष मा.सुनील तेलतुंबडे,स्वतंत्र अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या संघटीका मा.सुरेखाताई अथरगडे,मा.जयश्री पाटील.समन्वयक मा.गोकुळजी पाटील,यांनी मार्गदर्शन केले.मान्यवरांनी ट्रेड युनियन चे महत्व व व्याप्ती याबद्दल मार्गदर्शन केले. अंगणवाडी सेविकेच्या समस्या व त्यावर उपाय याबाबत सभेत चर्चा करण्यात आली. मा.गणेशजी उके यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या हक्कासाठी केलेले कायदे याची सविस्तर माहिती दिली.मा.सुनील तेलतुंबडे यांनी संविधानिक कामगारांच्या हक्काबाबत मार्गदर्शन केले. सभेचे संचालन व आभार सुरेखा अथरगडे यांनी केले. सभेला परिसरातील अंगणवाडी सेविका, मदतनीस प्रतिनिधीक स्वरूपात मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र पथक नेमून शासकीय आरोग्य संस्थांमधील साहित्याची तपासणी करावी - ना. संजय बनसोडे

### कोरोनाच्या नवीन व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाचा आढावा

लातूर :- काही राज्यांमध्ये कोरोनाच्या नवीन व्हेरियंटचे रुग्ण आढळून आले आहेत. जिल्ह्यात सध्या या व्हेरियंटचा एकही रुग्ण नसला तरी खबरदारीचा उपाय म्हणून आरोग्य यंत्रणेने सज्ज राहणे आवश्यक आहे. याकरिता जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमधील व्हेंटिलेटर, ऑक्सिजन सिलेंडरसह इतर उपलब्ध साधनसामग्रीची जिल्हास्तरीय पथकामार्फत तपासणी करण्याच्या सूचना क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी आज येथे दिल्या. कोरोनाचा नवीन व्हेरियंट जेएन-वनचा प्रसार देशातील काही राज्यांमध्ये होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या सज्जतेचा आढावा घेण्यासाठी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत ना. बनसोडे बोलत होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे डॉ. उदय मोहिते, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांची यावेळी उपस्थिती होती.



कोरोनाच्या नवीन व्हेरियंटचे रुग्ण जिल्ह्यात आढळल्यास त्यावर उपचारासाठी आवश्यक साधनसामग्री, औषधी याचा पुरेसा साठा तालुकास्तरीय आरोग्य संस्थेतही उपलब्ध राहील, याची दक्षता घ्यावी. तसेच ऑक्सिजन सिलेंडरसह ऑक्सिजन प्लांटची सद्यस्थिती तपासून आवश्यक कार्यवाही तातडीने करावी. नागरिकांना या व्हेरियंटच्या अनुषंगाने अधिकृत माहिती देवून त्यांनी काय काळजी घ्यावी, याबाबत जनजागृती करावी, अशा सूचना ना. बनसोडे यांनी दिल्या. तसेच जिल्ह्यात सुरु असलेली प्राथमिक आरोग्य केंद्र आणि इतर आरोग्य संस्थांच्या इमारतींची कामे तातडीने पूर्ण करून त्या कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

कोरोनाच्या नवीन व्हेरियंटच्या अनुषंगाने प्राप्त सूचनांनुसार जिल्हास्तरावर आरोग्य यंत्रणेचा आढावा घेण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी दिली. कोरोनाच्या नवीन व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरावरून आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही सुरु असून याबाबत जिल्हास्तरावरही सातत्याने आढावा घेतला जात आहे. जिल्ह्यात सध्या या व्हेरियंटचा रुग्ण आढळून आलेला नसला तरी लक्षणे असलेल्या रुग्णांची कोरोना चाचणी करण्यासाठी कीट उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कोरोना बाधित रुग्ण आढळल्यास त्याच्यावर उपचारासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वडगावे यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यात उपलब्ध आरोग्य साधनसामग्रीची माहिती त्यांनी यावेळी दिली. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कोरोनाच्या नवीन व्हेरियंटच्या उपचारासाठी ५० खाटा राखीव ठेवण्यात आल्या असून व्हेंटिलेटर, ऑक्सिजन यंत्रणा तपासणीसाठी 'मॉक ड्रील' घेण्यात आल्याचे डॉ. मोहिते यांनी सांगितले.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# खोर्यातील आभासी शांततेला छेद

जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील बाफलियाज भागात गुरुवारी दुपारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ५ जवान शहीद झाले असून २ जण जखमी झाले आहेत. दहशतवाद्यांनी लष्कराच्या दोन वाहनांवर ग्रेनेड फेकल्यानंतर अंदाधुंद गोळीबार केला. पाकिस्तान समर्थित पीपल्स अँटी फॅसिस्ट फ्रंटने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या हल्ल्यानंतर भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. भारतीय जवान आणि दहशतवाद्यांमध्ये रात्री उशिरापर्यंत चकमक सुरु होती. दहशतवाद्यांना घटनास्थळावरून पळ काढता येऊ नये म्हणून परिसरात नाकेबंदी करण्यात आली. ४८ राष्ट्रीय रायफल्सची २ वाहने बाफलियाज येथून डेरा गलीकडे जात होती. यात एक जिप्सी आणि दुसरा ट्रक होता.राजौरी-थानामंडी-सुरनकोट मार्गावरील सावनी येथे भारतीय जवानांचे वाहन पोहोचताच दहशतवाद्यांनी प्रथम ग्रेनेड फेकले. यानंतर दोन्ही वाहने थांबताच ४ ते ६ दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. घटनास्थळावरून भीषण दृश्ये समोर आली आहेत. दोन्ही लष्करी वाहनांच्या तुटलेल्या काचा विखुरल्याचे फोटोमध्ये दिसत आहे, संपूर्ण परिसरात सुरक्षा दल तैनात करण्यात आले. पूंछमध्ये मागील २६ महिन्यांमध्ये दहशतवादी हल्ल्याची ही चौथी मोठी घटना आहे. ११ ऑक्टोबर २०२१ रोजी चामरेड भागात शोध मोहीम राबवणार्या सैनिकांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात ५ जवान शहीद झाले होते. त्यापाठोपाठ २० ऑक्टोबर २०२१ रोजी भटादुरियांमध्ये शोध मोहिमेदरम्यान झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ६ जवान शहीद झाले होते.

२० एप्रिल २०२३ मध्ये भटादुरियांमध्ये लष्करी वाहनावर पहिला ग्रेनेड हल्ला आणि त्यानंतर दबा धरून बसलेल्या दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात ५ जवान शहीद झाले आणि आता २१ डिसेंबर २०२३ ला सावनी येथे झालेल्या हल्ल्यात ५ जवान शहीद, तर २ जखमी झाले आहेत. अशा प्रकारे २०२१ पासून चार वेळा झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये आतापर्यंत २१ जवानांना आपण गमावले आहे. लक्षात घ्या आपण केवळ पूंछ जिल्ह्यातील दहशतवादी हल्ल्याविषयी बोलत आहोत. जम्मू-काश्मीरच्या इतर जिल्ह्यात अधूनमधून दहशतवादी हल्ले सुरूच आहेत. विशेष म्हणजे केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी १९ डिसेंबर रोजी लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात माहिती देताना जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी कारवायांमध्ये घट झाल्याचा दावा केला होता. या दाव्याच्या २४ तासांतच दहशतवाद्यांनी लष्कराला लक्ष्य करून केंद्राच्या दाव्यातील हवा काढली आहे. २० डिसेंबरपासून पूंछच्या बाफलियाज भागात दहशतवादी आणि लष्कराच्या जवानांमध्ये जोरदार धुमश्चक्री सुरू आहे.जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे राज्यघटनेतील कलम ३७० रद्द करणे हा जम्मू आणि काश्मीरचा कायापालट करण्यासाठी महत्वाचा टप्पा आहे, असा दावा केंद्र सरकारकडून केला जातो. सर्वोच्च न्यायालयाने कलम ३७० रद्द करण्याचा केंद्राचा निर्णय वैध ठरवल्यापासून या दाव्याला मोठी धार आली आहे. या प्रदेशात विकास कामे , पायाभूत सुविधांमध्ये झालेली उल्लेखनीय सुधारणा, सुरक्षा आणि सामाजिक-आर्थिक पैलूंमध्ये व्यापक बदल दिसून आल्याचे केंद्राचे म्हणणे आहे. पंतप्रधान विकास पॅकेज-२०१५ अंतर्गत ५३ प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. सन २०१९-२० पासून ते आतापर्यंत जम्मू-काश्मीरला ५३१९ कोटी रुपये निधी दिल्याचा दाखला केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी दिला.जम्मू-काश्मीरला केंद्रशासित प्रदेश करून राज्याच्या विकासासाठी भरीव निधी दिला, दहशतवादी हल्ल्यांना आळा घालण्यासाठी लष्कराचे ताफेच्या ताफे जागोजागी तैनात केले. यामुळे जम्मू-काश्मीरमध्ये स्थिरता आल्याचे केंद्राचे म्हणणे असले, तरी ही स्थिरता आभासी असल्याचेच या दहशतवादी हल्ल्यांवरून दिसते. प्रदेशातील शांतता आणि समृद्धीचे आकडे नक्कीच सर्वोत्तम आहेत, पण यामध्ये जम्मू-काश्मीरचे खरे प्रतिबिंब आहे कुठे? सर्वसामान्य जनतेचे म्हणणे काय? आजघडीला जेवढे सुरक्षा दलाचे, लष्कराचे जवान नाक्यानाक्यावर दिसतात, त्याच्या निम्म्या संख्येने तरी स्थानिक तेथील रस्ते, बाजारपेठांमध्ये मोकळेपणाने वावरू शकतात काय असे एक ना अनेक प्रश्न आजही तसेच आहेत. सुधारणा म्हणजे काय असा प्रश्न पडू शकतो. घुसखोरांची संख्या कमी झाली आहे, परंतु दहशतवादी आणि घुसखोर अजूनही जम्मू-काश्मीरच्या खोर्यात लक्षणीय आहेत. सुरक्षा दलांचे छापे आणि ऑपरेशन्सच्या दैनंदिन चक्राकडे पाहता खोर्यातील जनता सामान्य स्थितीत राहात असल्याचे वर्णन निश्चितच करता येणार नाही. दहशतवाद आणि घुसखोरीत स्थानिकांचा सहभाग आणि समर्थन लक्षणीय आहे. हायब्रिड दहशतवादी स्थानिक भरतीची एक नवीन श्रेणी इथे तयार झालेली आहे. ज्यांचे पोलिसांकडे पूर्वीचे काहीच रेकॉर्ड नाही, असे तरूण हायब्रिड दहशतवादी म्हणून तयार होत आहेत.

पंतप्रधान मोदींच्या जम्मू-काश्मीर दौर्याआधी आणि नंतर ९ दहशतवाद्यांना ठार करण्यात आले. त्यातील बहुतेक हायब्रिड दहशतवादी होते. हे हायब्रिड दहशतवादी परराज्यातून आलेले-अधिकारी कर्मचारी, कामगारांना लक्ष्य करत आहेत. कोम्बिग ऑपरेशनला पर्याय म्हणून दहशतवादी ड्रोनचा वापर करून शस्त्रास्त्र पुरवठा करत आहेत. दहशतवादी कारवायांना आळा घालणे हे खोर्याच्या विकासासाठी महत्त्वाचे तर आहेच. परंतु केवळ सैन्याची कुमक वाढवणे हा यावरचा उपाय आहे का? सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर निवडणुका घेणे आणि जनतेत विश्वासाची भावना तयार करणे हे आव्हान पेलण्याची खरी गरज आहे. संसदेतील घुसखोरीवर निवेदन देण्याऐवजी पळ काढणारे देशाचे नेतृत्व त्यासाठी तयार आहे का?

# मिमिक्री एक कला

'हसण्यासाठी जन्म आपुला' असे म्हटले जाते. हसण्याने आयुष्य वाढते असे म्हणतात. त्यासाठीच हास्य क्लब स्थापन झाले. माणसाचे आयुष्य सुख-दु:खाने भरलेले आहे. त्याच्या आयुष्यात चार दिवस सुखाचे तर चार दिवस दु:खाचे येतातच. जीवन जगताना अनेक समस्यांना तोंड देत आनंदाची वाट शोधावी लागते. जगाचे ओझे आपल्याच डोक्यावर आहे अशी समजूत करून घेऊन गंभीर चेह-याने जगणा-याच्या वाट्याला दु:खच येते. हे दु:ख झुगारून देऊन समस्यांना सामोरे जाणा-याला सुखाचे चार दिवस दिसू शकतात. अर्थात त्यासाठी त्याने सकारात्मक दृष्टिकोन ठेवायला हवा. जीवन सुस होण्यासाठीच विनोदाची कास धरावी लागते. विनोद हा निखळ, निर्झरासारखा हवा. विरोधाभासातून विनोद निर्माण होतो. विनोद हा हळुवारपणे गुण-दोषांचे दर्शन घडवणारा, अवगुण टिपणारा असतो. विनोद हा खोचक-बोचक नसावा, एखाद्याच्या व्यंगावर बेतणारा नसावा. विनोद हा समाजकारणातील, राजकारणातील अतिशयोक्तीची खिल्ली उडवणारा असतो. कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवनातही सहजपणे विनोद घडून जातो. विनोदाचे अनेक प्रकार आहेत. एखाद्याची खिल्ली उडवण्यासाठी विनोदाचा आधार घेतला जातो. माणसाच्या वर्तनातून, सवयीतून, देहबोलीतून विनोद बेतला जाऊ शकतो अथवा विनोदनिर्मिती होऊ शकते. एखाद्याची नक्कल करताना विनोदनिर्मिती होते. म्हणूनच नक्कल ही एक कला आहे असे म्हटले जाते. संपत सरल, दिवंगत राजू श्रीवास्तव आदी कलाकारांनी राजकीय व्यक्तींची खिल्ली उडवताना, नक्कल करताना विनोदाचे फव्वारे उडवले आहेत. मराठीतील 'चला हवा येऊ द्या' हा कार्यक्रमही त्यासाठीच प्रसिद्ध आहे. नक्कल प्रकरणावरून संसदेच्या दोन्ही सभागृहांत गोंधळ घातला गेला. संसदेच्या दोन्ही सदनांमध्ये गोंधळ घातल्याप्रकरणी 'इंडिया' महाआघाडीच्या बहुसंख्य खासदारांना सरकारने निलंबित केले.नव्या संसद भवनातील मकरद्वाराच्या पाय-यांवर बसलेल्या विरोधी खासदारांच्या घोळक्यामध्ये उभे राहून तृणमूल काँग्रेसचे लोकसभेतील निलंबित खासदार कल्याण बॅनर्जी यांनी उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांची नक्कल केली. या घटनेचे काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी चित्रीकरण केले होते. या घटनेवर धनखड यांनी राज्यसभेत सकाळच्या सत्रात निषेध व्यक्त केला होता. धनखड यांची मिमिक्री करत त्यांची खिल्ली उडवण्याच्या घटनेवरून राजकीय वातावरण तापले. पंतप्रधान मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या घटनेचा निषेध केला. मिमिक्री करणारे टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या विरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेबद्दल कल्याण बॅनर्जी यांनी माफी मागण्यास नकार दिला आहे. ते म्हणाले, मिमिक्री ही एक कला आहे. धनखड यांनी ती स्वत:वर का घेतली माहीत नाही. पंतप्रधान मोदींनी २०१४ ते २०१९ दरम्यान अनेक सभांमध्ये अशाच प्रकारचे कृत्य केले होते. लोकसभेतून निलंबित करण्यात आलेले खासदार संसद परिसरात विरोध प्रदर्शन करत होते.




त्यावेळी टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांनी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची मिमिक्री सुरू केली होती. या प्रकरणाने बुधवारी जातीय वळण घेतले.शेतक-यांचा आणि जाट समाजाचा अपमान झाल्याची टिप्पणी उपराष्ट्रपती धनखड यांनी केली. माझा कितीही अपमान झाला तरी मी सहन करू शकेन, पण माझ्या पदाचा, शेतकरी समुदायाचा, माझ्या समाजाचा (जाट) अपमान कधीही सहन करणार नाही, असा संताप धनखड यांनी राज्यसभेत व्यक्त केला. ज्यांनी नक्कल करणा-यांचे चित्रीकरण केले आणि नक्कल करणा-याला प्रोत्साहन दिले त्यांच्यावर हेच संस्कार झाले का असा, सवाल करत राहुल गांधींना धनखड यांनी लक्ष्य केले. यावर कोणी कुणाचा अपमान केला? खासदार पाय-यांवर बसले होते, मी चित्रीकरण केले ते माझ्या फोनमध्ये आहे. प्रसारमाध्यमे काही भलतेच दाखवत आहेत. पंतप्रधान मोदी वारंवार टिप्पणी करत असतात, पण कोणीच काही बोलत नाही, असे प्रत्युत्तर राहुल गांधी यांनी दिले. या प्रकरणावरून सत्ताधारी आणि विरोधकांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. मिमिक्री प्रकरणावर भाष्य करताना शिवसेना ठाकरे गटाने म्हटले आहे की, मिमिक्री प्रकरण हे मूळ प्रश्नावरील जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठीच आहे. संविधान पदावर निर्जीव बाहुल्यांचा खेळ सुरू आहे. बाहुल्यांचे अश्रू खोटे असतात. पदावरील बाहुल्यांनी अपमानाचा बाऊ करू नये.दहा वर्षांत मोदींनी संसदेत अन् बाहेर विरोधकांच्या नकलाच केल्या होत्या. नकलाकारांची नक्कल झाली तर ती त्यांना का झोंबावी? न झालेल्या अपमानाचे भांडवल पंतप्रधान मोदी व त्यांचा भाजप करत आहे. उपराष्ट्रपती धनखड यांनी राज्यसभेत संसद घुसखोरीच्या मुद्यावर बोलू दिले नाही. विरोधी पक्षांच्या खासदारांनी गृहमंत्री शहा यांच्या विरोधात उग्र रूप धारण केले तेव्हा उपराष्ट्रपतींनी भाजपविरोधी खासदारांना निलंबित केले. संसदेच्या पायरीवर निलंबित खासदार घोषणा देत बसले. त्यावेळी कल्याण बॅनर्जी यांनी धनखड यांच्या वागण्या-बोलण्याची नक्कल करून हशा व टाळ्या मिळवल्या, हा आता वादाचा विषय ठरला. गत दहा वर्षांपासून मोदींनी संसदेत व बाहेर विरोधकांच्या नकलाच केल्या. त्यामुळे एखाद्याची नक्कल करणे हा दंडनीय अथवा रडारड करण्यासारखा अपराध नाही. संविधानाची खुर्ची म्हणजे पानाची गादी नाही, की राष्ट्रीय प्रश्नावर फक्त चुना लावत बसायचे! सध्या देशात तेच चालले आहे. एखाद्या व्यक्तीची नक्कल केली गेल्यास ती खिलाडूवृत्तीने स्वीकारण्याचा मनाचा मोठेपणा त्या व्यक्तीने दाखवायला हवा. नक्कल केल्याप्रमाणे धनखड यांचे वर्तन नसेल तर त्यांना राग का यावा?

# धम्मपरिषद मध्ये ढवळाढवळ करणाऱ्यां राजकीय व्यक्तींना जाहीरपणे धडा शिकवा.

आंबेडकरी चळवळीत रिपब्लिकन पक्षाचे वेगवेगळे गट महाराष्ट्रात आहेत,ज्याचे अनेक राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष असून ते महाराष्ट्राच्या राजकारणात उपद्रव्य मूल्य दाखविण्यात आघाडीवर आहेत.ते राजकीय अस्तित्वासाठी नेहमीच धडपड करीत असतात.ते राजकीय अस्तित्व गमाऊन बसले असल्यामुळे धम्माचा आधार घेऊन धम्म परिषदेच्या माध्यमातून आपल्या मागे जनाधार आहे हे दाखविण्याचा केविलवाणी प्रयत्न करीत असतात.अशा नेत्यांची उपस्थिती असलेल्या धम्म परिषदच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला पाहिजे. त्यामुळे त्यांच्या मागे कुठला ही जनाधार नाही हे सिद्ध होते,संघटना स्थानिक पातळीवरची,पण नावे मात्र भारतीय आणि देशपातळीवरील संघटना,असे लेटरहेडच्या माध्यमातून भासवत असतात.असे पक्ष आणि त्यांचे नेते सत्ताधारी पक्षाची लाचार होऊन चाकरी करीत असतात,मनुवादी विचारांच्या पक्षाच्या व्यक्तीच्या आर्थिक मदतीवर धम्म परिषद घेणाऱ्या आयोजकांचे चरित्र पाहून धम्म उपासक उपासिकांनी बहिष्कार टाकला पाहिजे. तुमच्या भावनिक उपस्थितीने त्यांच्या पदरामध्ये काही तरी पडेल,याच विचारांने ते काही लाचार दलाल चरित्रहीन कार्यकर्ते नेत्यांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करीत असतात.परंतु त्यांना धम्माशी समाजाशी आणि चळवळीशी काही घेणे - देणे नसते. आंबेडकरी विचारांची संघटना स्वार्थासाठी वापरली जाते.सामाजिक बांधिलकी ठेऊन लोक कल्याणासाठी नाही.असे राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते जेव्हा काही भनतेना हाताशी धरून धम्म परिषदांचे आयोजन करतात, तेव्हा धम्मापेक्षा स्वतः ला राजकीय लाभ कसा मिळेल,याच्या चिंतेत ते असतात.असे नेते बुद्ध धम्माच्या पंचशीलेचे पालन आपल्या दररोजच्या आचरणात आणतात का?. पूज्य भनते खरोखरच विचाराने आचरणाने पूज्य आहेत काय हे पण आपण उपासक उपासिका यांनी तपासले पाहिजे.भावनिक होऊन कोणाच्या ही कार्यक्रमाला उपस्थिती दाखवून नालायक कार्यकर्त्यांना व नेत्यांना मोठे करू नका.ते मोठे झाल्यावर तुमचाचं बळी घेतात.हा गेल्या चाळीस वर्षाच्या राजकीय वाटचालीचा इतिहास डोळ्यासमोर ठेऊन वाचा किंवा पहा. बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेली दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा) ही भारतातील तमाम बौद्धांची मातृसंस्था,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धम्म क्रांती देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवित असतांना, मनुवादी संघटना अशा नेत्यांना साधनसामुग्री देऊन,धम्मक्रांतीला खीळ घालण्याचा कुटील प्रयत्न करीत आहेत.त्यांच्यापासून सावध राहून बहिष्कार घालणे यातच आपले आपल्या समाजाचे आणि चळवळीचे हित आह. आजच्या जमान्यात सर्वात जास्त मागासवर्गीय ओबीसी,भटके विमुक्त जाती जमातीचे,चांभार,महार,मांग,एस सी,एस टी,महाराचे बौद्ध झाले सुशिक्षित गद्दार आज घरात गणपती उत्सव पांच,दहा दिवस साजरा करतांना दिसतात.ते स्वतच्या धर्माशी गद्दारी करताचं पण ब्राम्हणाच्या प्रवित्र देवाची विटंबना करून बाटवतात. त्यांनाच हाताशी धरून असा धम्मा परिषदेचे आयोजन केले जाते.आज आपण थोडे धाडस दाखविले तर त्यांचे मनसुबे पाहिलेले स्वप्न नष्ट झाल्या शिवाय राहणार नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रबोधन धम्म उपासक शिबिरातून तयार झालेल्या धम्म उपासक उपासिका आणि बौद्धचार्य यांच्या सहकार्याने सहभागाने कोणताही संघर्ष न करता संघटित पणे विचारपूर्वक बहिष्कार घालून धम्मपरिषद मध्ये ढवळाढवळ करणाऱ्यां राजकीय व्यक्तींना कार्यकर्त्यांना जाहीरपणे धडा शिकवा.त्यांच्या धम्मा परिषदला आमचा विरोध नाही,पण त्यांनी दोन दगडावर पाय ठेऊन एका बाजूला मागासवर्गीय ओबीसी,एस सी,एस टी,व्ही जे एन टी जाती धर्माचे सांगून शिक्षणात,नोकरीत आणि इतर सर्व ठिकाणी सवलती घ्याच्या आणि दुसरीकडे कट्टरपंथीय हिंदू म्हंणून मनुवादी राजकीय पक्षाच्या आशीर्वादाने आमची प्रगती झाली, मुले झाली,त्यांना नोकरी लागली असे बेशरमपणे सांगायचे हे सत्य असेल तर सरकारच्या जातीच्या कोणत्याही सवलती घेऊ नये,मागासवर्गीय ओबीसी,एस सी,एस टी,व्ही जे एन टी जाती धर्माचे सांगून शिक्षणात,नोकरीत आणि इतर सर्व ठिकाणी सवलती बंदच झाल्या पाहिजेत.विशेष स्वतःला बौद्ध किंवा जयभिमवाले समजणाऱ्या गणपती उत्सव, नवरात्र उत्सव साजरा करणाऱ्या गद्दारांना घरात घुसून मारले पाहिजे. स्वताच्या धर्माचा अपमान करून हिंदू धर्माच्या प्रवित्र देवाचा उत्सव साजरा करून धम्मा परिषदा घेणाऱ्या कार्यकर्त्यांना नेत्यांना राजकीय व्यक्तींना जाहीरपणे धडा शिकवला पाहिजे.आणि त्यांनी स्वतःला बौद्ध किंवा जयभिमवाले समजू नये,हिंदू धर्मात किड्या मुंगी सारखे जगावे की मरावे हा त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे.म्हणूनच मी असे लिहतो अशा धम्मपरिषद मध्ये ढवळाढवळ करणाऱ्यां राजकीय व्यक्तींना जाहीरपणे धडा शिकवा.

हे स्वातंत्र्य त्याला भारतीय संविधानाने दिले.पण माणूस म्हणून जगण्याचा अधिकार ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कष्ट त्याग जिद्दीमुळे आणि अपमानास्पद वागणूक सहन करून मिळवुन दिला.त्यांच्याशी बेईमानी करून कोणी धम्माच्या विरोधात वागत असेल तर त्याला त्याची लायकी दाखवून दिली पाहिजे,हे काम आम्ही सामाजिक बांधिलकी म्हणून करतो. असे समजून सांगून प्रबोधन करून ऐकत असेल



तर त्यांचे समाज स्वागत करतो,आणि ऐकत नसेल तर त्याला पाणी पिण्याचा,शिक्षण घेण्याचा आणि माणूस म्हणून जगण्याचा अधिकार कोणी दिला मनुवादी पक्षाने कि भारतीय संविधान लिहलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी. मनुवादी विचारांच्या पक्षाने मागासवर्गीय,आदिवाशी,अल्पसंख्याक समाजातील नगरसेवक,आमदार,खासदार ,मंत्री,उपप्रधानमंत्री आणि राष्ट्रपती केले. तरी त्याला त्यांच्या जातीच्या समाज व्यवस्थेनुसार वागणूक दिली जाते.आणि मिळते हा इतिहास आहे.हे माहीती असूनही कोणी स्वताला समाजा पेक्षा जास्त मोठा समजून व्यक्तिगत पातळीवर त्याच्या मना सारखा वागत असेल तर तो त्यांचा व्यक्तिगत पातळीवर अधिकार आहे. हे आमचे व्यक्तिगत मत नाही, तर सामाजिक बांधिलकी म्हणून समाजातील चुकीच्या पद्धतीने वागणाऱ्या व्यक्तीला समज देऊन समाजात माणूस म्हणून जगण्यासाठी प्रबोधन आहे.

ज्यांना वाटत असेल कि मनुवादी विचारांच्या पक्षात काम करून पद भूषविल्याने त्यांची जात बदली झाली असेल तर त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन संघर्ष वाचावा.देश स्वातंत्र्य झाल्यावर देशाचे उपप्रधानमंत्री झालेले बाबू जगजीवनराम, रामनाथ कोविंद,द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती झाल्यावरही यांना माणूस म्हणून हिंदुच्या मंदिरात प्रवेश नव्हता. त्यांचे शिक्षण,त्यांचं पद याच हिंदू धर्माच्या समाजव्यवस्थेला काहीच मान्य नव्हते.मग मागासवर्गीय ओबीसी,एस सी,एस टी,व्ही जे एन टी जाती धर्माच्या लोकांनी मनुवादी विचारांच्या पक्षात काम करून पद भूषविल्याने भटा,ब्राम्हणांच्या नियंत्रणा खाली असलेला सुवर्ण मराठा समाज मान्य करेल काय?.

काही राजकीय दलाली करून स्वताचे अस्तित्व टिकविणारे लोक असतात.ते याकडे दुर्लक्ष करण्याचे सांगतात.स्वता वैचारिक प्रबोधन करीत नाही आणि प्रबोधन करणाऱ्यांचे मानसिक दुष्ट्या खच्चीकरण करतात. अशा स्वार्थी बेईमान कार्यकर्ता नेत्यांना समाजाने योग्य वेळी त्यांची जागा दाखवून दिली पाहिजे.काही उच्चशिक्षित उच्चपदस्थ अधिकारी कलावंत मनुवादी विचारांच्या पक्षात काम करून पद भूषविनाऱ्या व्यक्तीचे समर्थन करतात. त्यांच्याकडे आंबेडकरी चळवळीचे निर्लज राजकीय नेते जातात.त्यांची समाजात चर्चा होते पण इलाज होत नाही.समाज मान्यताप्राप्त संस्था,संघटना निर्णय घेण्यास असमर्थ आहेत.म्हणूनच मी असे लिहतो की अशा मनुवादी विचारांच्या पक्षात काम करून पद भूषविनाऱ्या आणि धम्मपरिषद मध्ये ढवळाढवळ करणाऱ्यां राजकीय व्यक्तीच्या प्रमुख उपस्थिती वर जाहीरपणे बहिष्कार टाकून धडा शिकवा.

*************

**सागर रामभाऊ तायडे-**
**९९२०४०३८५९,**
**भांडूप,मुंबई.**

# कोल्हापूरकरांना माहितीय, मी खोलात जाईन

मुंबई : जितेंद्र आव्हाड हे भ्रमिष्ट झाले आहेत, एकाकी पडले आहेत त्यामुळे ते वेगवेगळी वक्तव्ये करत आहेत, अशा पद्धतीचा पलटवार मंत्री हसन मुश्रीफ यांनी केला आहे. जर भाजपसोबत जाण्याबाबतच्या चर्चेमध्ये मी नसतो तर मंत्री झालो असतो का? असा सवाल देखील हसन मुश्रीफ यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाडांनी मंत्री हसन मुश्रीफांना प्रत्युत्तर दिले आहे. एकेरी शब्द वापरणे ही मुश्रीफांची संस्कृती आहे. तुम्ही माझ्या नादी लागू नका, मी तुमच्या नादाला लागलो नाही असे उत्तर आव्हाड यांनी दिले.जितेंद्र आव्हाड म्हणाले, एकेरी शब्द वापरणे ही त्यांची संस्कृती आहे. मुश्रीफ यांच्याशी मी माझ्या राजकीय जीवनात पाच मिनिटे सुद्धा बोललेलो नाही. २०१९ ला पवार साहेबांच्या घरी मीटिंग झाली होती त्यावेळी सगळे नेते उपस्थित होते. त्यावेळी भाजपसोबत जाण्यासाठी मुश्रीफ यांनी टोकाचा विरोध केला होता. मी पत्रावर सही केली पण बाहेर आल्यावर जयंत पाटील यांना सांगितले की, मला हे मान्य नाही. जयंत पाटलांना देखील ते मान्य होतं. ते पत्र आजही जयंत पाटलांच्या खिशात आहे.मी कधी कोणाला धोका दिला नाही. एकदा लढाई करायची ठरवली तर पुढे जो निर्णय होईल तो होईल. सदाशिव मंडलिक यांच्यासोबत तुमचे काय संबंध होते, त्यांनी तुम्हाला कुठपर्यंत आणले हे सर्व



कोल्हापूरकरांना माहीत आहे. माझ्या नादाला लागू नका, बोलायला गेलो तर मी खूप खोलात जाईन. मी कधीच गद्दारी केली नाही, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.फुले-शाहू-आंबेडकर एका मांडीवर आणि गोळवलकर दुस-या मांडीवर, अजित पवारांवर निशाणा अजित पवारांवर देखील जितेंद्र आव्हाडांनी टीका केली आहे. जितेंद्र आव्हाड म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर एका मांडीवर आणि गोळवलकर त्यांच्या एका मांडीवर आहेत. कर्नाटकातील बुरखा बंदीवर जितेंद्र आव्हाड म्हणाले, या देशात कोणी काय खावे? कोणी काय घालावे? कोणी कोणत्या धर्माचा आदेश मानावा हे त्याच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर अवलंबून असते. विधानाने दिलेले हे स्वातंत्र्य आहे. संविधान हे कुठल्याही सरकारपेक्षा मोठे असते.

# स्थगित झालेले मराठा आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा

मुंबई : मराठा आरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली क्युरेटिव्ह पिटीशन सुप्रीम कोर्टाने स्वीकारली आहे. हा महायुती सरकारचा मोठा विजय असल्याचे मत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. मराठा आरक्षणासंदर्भात क्युरेटीव्ह याचिका स्वीकारल्यानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट केले आहे. यामध्ये त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नाकर्तेपणामुळे स्थगित झालेले मराठा आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे बावनकुळे म्हणाले.राज्यातील महायुती सरकारने भक्कमपणे सुप्रीम कोर्टात बाजू मांडल्यामुळे कायदेशीर



मराठा आरक्षण मिळण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. मराठा आरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली क्युरेटिव्ह पिटीशन सुप्रीम कोर्टाने स्वीकारली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि मविआ सरकारच्या नाकर्तेपणामुळे स्थगित झालेले मराठा आरक्षण पुन्हा मिळण्यासाठीचा मार्ग प्रशस्त झाला. मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी कुठल्याही प्रवर्गाला धक्का न लावता मराठा समाजाला दिलेले आरक्षण पुन्हा मिळवण्यासाठी महायुती सरकार सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू मजबुतीने मांडेल आणि मराठा समाजाला न्याय देईल ही खात्री असल्याचे ट्वीटमध्ये जरांगे यांनी म्हटले आहे.

# महाविकास आघाडीचा लोकसभा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला?

छत्रपती संभाजीनगर : लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला येत्या २९ आणि ३० डिसेंबर रोजी ठरणार आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नागपूर दौ-यानंतर दिल्लीत जागावाटपाबाबत बैठक होणार आहे. जागावाटपाबाबत दोन फॉर्म्युल्यांवर चर्चा होऊ शकते. महत्त्वाचं म्हणजे छत्रपती संभाजीनगरची जागा लढवण्यासाठी एका पक्षातील बडा नेता काँग्रेसमध्ये प्रवेश करू शकतो असेही कळते.आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काही महिन्यांचा कालावधी शिल्लक असताना आता राजकीय पक्षांकडून लोकसभा जागा लढवण्यासाठीची तयारी सुरू करण्यात आली आहे. देशव्यापी पातळीवरील इंडिया आघाडीतील महाविकास आघाडीतही जागावाटपाचे सूत्र निश्चित झाल्याची चर्चा सुरू आहे. राज्यात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि काँग्रेस यांचा समावेश असलेल्या महाविकास आघाडीमध्ये जागावाटप जवळपास निश्चित झाल्याची चर्चा आहे. अशातच आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेसने आगामी लोकसभा निवडणुकीत १५ ते १६ जागा लढवण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे.मविआसोबत आणखी कोणते पक्ष?महाविकास आघाडीसोबत डाव्या-प्रागतिक पक्षांची आघाडी आहे. यामध्ये डावे पक्ष, समाजवादी पक्ष, शेकाप आदी पक्ष आहेत. तर, वंचित बहुजन आघाडीची शिवसेना ठाकरे गटासोबत युती आहे. त्यामुळे जागा वाटप करताना या पक्षांनादेखील विचारात घ्यावे लागणार आहे. या पक्षांना लोकसभेसाठी



जागा न सोडल्यास विधानसभेसाठी जागा मविआला सोडाव्याच लागणार आहेत. त्यामुळे मविआमध्ये लोकसभा जागा वाटप वर दिलेल्या फॉर्म्युल्याप्रमाणे होते की आणखी काही फॉर्म्युला ठरतोय, हे लवकरच समजेल.कोणताही फॉर्म्युला ठरला नाही : नाना पटोले महाराष्ट्रात लोकसभेच्या जागा वाटपासंदर्भात कोणताही फॉर्म्युला ठरला नाही. संजय राऊत कुठून आकडे देतात त्यांना माहीत नाही. संजय राऊत यांना बोलायची सवय आहे त्यांच्या आकड्यावर मी बोलणार नाही. २९ डिसेंबर रोजी काँग्रेसची बैठक आहे. त्या बैठकीत मित्रपक्षांसोबत जागावाटपावर चर्चा होईल. मेरीटच्या आधारावर जागा वाटप अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.

## यालाच सगळे कळतेय का? एकाकी पडल्यामुळे भ्रमिष्ट झालाय

कोल्हापूर : भाजप आणि शिंदेंसोबत जाण्यासाठी जितेंद्र आव्हाडांचा पुढाकार होता, असा गौप्यस्फोट वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफांनी केला आहे. तर आव्हाडांना पक्षात कोणीही विचारत नाही, अशी टीका देखील मुश्रीफांनी यावेळी केली आहे. ते कोल्हापुरात माध्यमांशी बोलत होते. एकाकी पडल्यामुळे आव्हाड भ्रमिष्ट झाल्याचे देखील वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले.मंत्री हसन मुश्रीफांनी जितेंद्र आव्हाडांवर गंभीर आरोप केले आहेत. आरोप करताना मुश्रीफांनी जितेंद्र आव्हाडांवर एकेरी शब्दात



हल्लाबोल केला आहे. यालाच सगळं कळतंय का? असे म्हणत एकेरी शब्दात टीका केली आहे. मुश्रीफ म्हणाले, जितेंद्र आव्हाडांना पक्षात कोणी विचारत नाही. एकाकी पडल्यामुळे ते भ्रमिष्ट अवस्थेत आहेत.आमची सत्ता पहिल्यांदा गेली तेव्हा भारतीय जनता पार्टी आणि शिंदे यांच्यासोबत जावे यासाठी जितेंद्र आव्हाड यांनी पुढाकार घेतला होता. यावेळी आमदारांनी सह्या केल्या त्या पेपरवर जितेंद्र आव्हाडांची सही एक नंबरला होती. आम्ही भाजपसोबत जाणार त्यावेळी झालेल्या चर्चेत जितेंद्र आव्हाड नव्हते. माझा भाजपसोबत जायच्या निर्णयाला विरोध असता तर मी मंत्रिपदाची शपथ घेतली असती का? असा सवाल हसन मुश्रीफ यांनी केला आहे.

# गर्भनिरोधक गोळ्यांमुळे १६ वर्षीय मुलीचा मृत्यू; या गोळ्या वाढवतायत हार्ट अटॅक, स्ट्रोकचा धोका? डॉक्टर सांगतात

नको असलेली गर्भधारणा टाळण्यासाठी अनेक महिला गर्भनिरोधक गोळ्यांचा अवलंब करतात. पण या गोळ्या घेतल्याने महिलांना नुकसान होऊ शकतो काय बहुतांश महिला गर्भधारणा टाळण्यासाठी गर्भनिरोधक गोळ्यांचा वापर करतात. या गोळ्या आपल्या मासिक पाळीच्या चक्रावर काम करत असतात. या गोळ्यांमुळे गर्भधारणा रोखली जाऊ शकते. मात्र, गर्भनिरोधक गोळ्यांचा दररोज वापर केल्यास, त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, असे डॉक्टर नेहमी सांगत असतात. तोंडावाटे गर्भनिरोधक गोळ्या घेतल्याने रक्ताच्या गुठळ्या होऊ शकतात आणि ती बाब प्राणघातक ठरू शकते.नुकतीच मासिक पाळीमुळे होणाऱ्या वेदना कमी करण्यासाठी गर्भनिरोधक गोळ्या घेतल्याने १६ वर्षीय मुलीचा रक्ताच्या गुठळ्या होऊन मृत्यू झाल्याची घटना ब्रिटनमध्ये घडली आहे. यूकेस्थित लैला हिने मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी गर्भनिरोधक गोळी घेतल्यापासून तीन आठवड्यांनंतर तिच्या पोटात काही समस्या आढळून आल्या. या समस्या आढळल्यानंतर अवघ्या पुढच्या ४८ तासांमध्ये शरीरात रक्ताच्या गुठळ्या तयार झाल्या आणि तिला स्ट्रोकचा झटका आल्याने तिचे निधन झाले.या मुलीच्या निधनामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गर्भनिरोधक गोळ्या घेतल्याने हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढू शकतो का? आता याच विषयावर नवी दिल्ली येथील वरिष्ठ सल्लागार, प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. उमा वैद्यनाथन यांनी माहिती दिली असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.डॉक्टर सांगतात, भारतात गर्भनिरोधक गोळ्या ही कुटुंब नियोजनाची प्रभावी पद्धत आहे. जर योग्य पद्धतीने गोळ्या घेतल्या, तर त्या गर्भधारणा १०० टक्के थांबवतात. गर्भनिरोधक गोळ्यांमध्ये इस्ट्रोजेन व प्रोजेस्ट्रॉन असतात. त्याला 'सीओसी' म्हणतात. तर, दुसऱ्या गोळीत प्रोजेस्ट्रॉन असते. त्याला 'पीओपी' असे म्हणतात. जर एखादी महिला धूम्रपान करीत असेल आणि ती इस्ट्रोजनयुक्त गर्भनिरोधक गोळ्या घेत असेल, तर रक्ताच्या गुठळ्या होतात.गर्भनिरोधक किंवा गर्भनिरोधक गोळ्या सुरक्षित असल्या तरी त्यांच्या डोसचे वैद्यकीय निरीक्षण करणे आवश्यक आहे. नाही तर धोका होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. गर्भनिरोधक गोळी घेतल्यानंतर रक्त गोठण्याची तक्रार करणारे रुग्ण आढळले आहेत; ज्यात या गोळ्यांमुळे त्यांच्या पायाच्या नसांमध्ये गुठळ्या निर्माण झाल्या. या गोळयांचा अतिवापर केल्याने धोका होऊ शकतो. म्हणून महिलांमध्ये अधिक जागरूकता असणे आवश्यक आहे, असे डॉ. वैद्यनाथन सांगतात. त्याशिवाय, गर्भनिरोधक गोळ्या वापरण्याची योग्यता स्त्रीची आरोग्य स्थिती, वय, वैद्यकीय इतिहास व धूम्रपान स्थिती यांसह अनेक घटकांवर अवलंबून असते. औषधविक्रेते पात्रतेबद्दल कोणतेही प्रश्न विचारत नाहीत किंवा गर्भनिरोधक गोळ्यांच्या योग्य व सुरक्षित वापरासाठी फार्मासिस्टना मार्गदर्शन करण्यासाठी यूएस आणि यूकेच्या विपरीत भारतात कोणतेही अलर्ट प्रोटोकॉल नाहीत.डेटा विश्लेषण दर्शविते की, इस्ट्रोजेनच्या उच्च डोससह इस्केमिक स्ट्रोक किंवा मायोकार्डियल इन्फेक्शनचा धोका वाढतो. गोळ्यांमध्ये ५० मायक्रोग्रॅमपेक्षा जास्त इस्ट्रोजेन असल्यास रक्तातील गोठण्याचे घटक वाढतात तेव्हा हा धोका सर्वाधिक असतो. आता बहुतांशी ५० मायक्रोग्रॅमपेक्षा कमी एस्ट्रोजेन असते. त्यामुळे गर्भनिरोधक गोळ्या वापरणे अधिक सुरक्षित आहे. ३० मायक्रोग्रॅम एस्ट्रोजेन आणि लेव्होनॉर्जेस्ट्रेल असलेली गोळी हे तोंडी घेण्याचे सर्वांत सुरक्षित गर्भनिरोधक असल्याचे समोर आले आहे.महिलांनी कोणती काळजी घ्यावी?नको असलेल्या गर्भधारणेपासून संरक्षण करण्यासाठी कंडोम व गर्भनिरोधक गोळ्या दोन्ही प्रभावी पर्याय आहेत. मात्र, एसटीडी किंवा एसटीआयपासून म्हणजेच लैंगिक रोगांपासून संरक्षण हवे असल्यास कंडोम वापरण्याचा सल्ला दिला जातो.



गर्भनिरोधक म्हणून कंडोम अत्यंत आवश्यक आहे. कंडोम आपल्याला लैंगिक संक्रमित रोगांपासूनही वाचवू शकते. कंडोम ही जन्म नियंत्रणाची लोकप्रिय पद्धत आहे. पण, आरोग्याशी संबंधित कोणतीही समस्या असेल, तर तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी बोलणे केव्हाही चांगले.

# कोव्हिडच्या नव अवताराचे नाहक भय नको


..आणि कोव्हिडची चर्चा पुन्हा सुरु झाली आहे. दर महिन्या दोन महिन्यांनी कोव्हिडचे नवे बाळ आपल्याला भेटायला येते आहे. आता जे.एन. १ हे कोविडचे नवे बाळ आपल्या अंगणात आले आहे. मूळात हे नवे बाळ ओमायक्रॉन कुटुंबातीलच आहे. आपण नियमितपणे कोव्हिड विषाणूंचे जनुकीय क्रमनिर्धारण करतो आहोत आणि त्यामुळे विषाणूंमध्ये होणारे जनुकीय बदल आपल्याला लगोलग कळत आहेत. जे एन .१ हा नवा विषाणू प्रकार मुळात फार काळजी करावा असा नाही. सध्या अमेरिका, चीन, सिंगापूर आणि भारतात हा नवा विषाणू आढळून आलेला आहे. जागतिक आरोग्य संघटना याला व्हेरियंट ऑफ कंसर्न म्हणजे काळजी करावा असा व्हेरियंट म्हणत नाही कारण या नव्या विषाणू प्रकारामुळे आजार प्रसाराचा वेग जरी वाढत असला तरी त्याचा संसर्ग घातक नाही. एकूणात सौम्य स्वरुपाचा संसर्ग होताना दिसतो आहे.मुळात कोव्हिड विषाणू आता आपल्या वातावरणात स्थिरावला आहे. शास्त्रीय भाषेत सांगायचे म्हणजे हा विषाणू एंडेमिक झाला आहे त्यामुळे हवामानानुसार त्यामध्ये वाढ आणि घट होऊ शकते. सध्या देशासह राज्यात शीतलहर सुरु आहे. या सीझनल बदलामुळे इन्फ्ल्युएंझा , कोविड आजारामध्ये वाढ होते आहे. त्यामुळे आता कोव्हिड रुग्णांमध्ये काही प्रमाणात जी वाढ होताना दिसते आहे ती केवळ जे.एन. ७ मुळे आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल. या वाढीमध्ये हवामानविषयक घटकांचा वाटा मोठा आहे. येणाऱ्या काळातही इन्फ्ल्युएंझाप्रमाणे कोव्हिडदेखील पावसाळा आणि हिवाळयात काही प्रमाणात वाढू शकतो, हे आपण



लक्षात घेतले पाहिजे.स्वतःच्या जनुकीय रचनेमध्ये सातत्याने बदल करत राहणे हा विषाणूच्या जीवनक्रमातील नैसर्गिक भाग आहे. विषाणूला स्वतःची संख्या वाढविण्यासाठी एका सजीव पेशीची गरज असते. या सजीव पेशीतील संसाधनाच्या मदतीने विषाणू स्वतःची संख्या वाढवत असतो. विषाणूंची संख्यात्मक वाढ होत असताना त्यामध्ये काही चुका जाणता अजाणता होतात, त्यालाच आपण म्युटेशन असे म्हणतो.

# मधुमेह, हृदय अन् डोळ्यांच्या आरोग्यासाठी 'ही' भाजी ठरतेय गुणकारी; आहारात करा समावेश

जाणून घेऊ १०० ग्रॅम सलगम भाजीचा आहारात समावेश केल्यास कोणते फायदे मिळतात?हिवाळा ऋतू आपल्याबरोबर भरपूर स्वादिष्ट आणि आरोग्यदायी हंगामी भाज्या घेऊन येतो. या भाज्यांमध्ये अनेक पौष्टिक घटक असतात; ज्यांच्या सेवनामुळे अनेक आजारांपासून आराम मिळतो. त्यात भरपूर प्रमाणात फायबर, मँगनीज व सेलेनियम यांसारखी सूक्ष्म खनिजे असतात. याच भाज्यांपैकी एक भाजी म्हणजे सलगम. मलाईदार पांढऱ्या आणि जांभळ्या रंगाची ही भाजी मधुमेह, हृदय अन् डोळ्यांच्या



आरोग्यासाठी फायदेशीर मानली जाते. दरम्यान, उजाला सिग्नस ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या डाएटिशियन एकता सिंघवाल यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना १०० ग्रॅम सलमग भाजीत किती प्रमाणात पोषक घटक असतात हे सांगितले आहे.

# आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या डॉ तृप्ती रोकडे यांचा सामाजिक संघटनाद्वारे सत्कार..

उल्हासनगर : उल्हासनगर च्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञ म्हणुन २०१८ पासुन कार्यरत असलेल्या डॉ तृप्ती रोकडे ह्या नेहमीच गोर गरीब महिला रुग्णाचे काम निष्ठेने करुन आपले कर्तव्य निभावत आहेत. त्यामुळे येथील सामाजिक संघटनानी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा सत्कार केला आहे.

उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञ म्हणुन डॉ . तृप्ती रोकडे या २०१८ पासुन कार्यरत आहेत . त्यांनी शेकडो महिलांच्या शस्त्रक्रिया केल्या आहेत. त्यामध्ये गंभीर स्वरुपाच्या सुध्दा शस्त्रक्रिया होत्या. एका गरीब महिलेच्या गर्भाशयातुन २ किलो ऐवढ्या वजनाचा मांसाचा गोळा काढल्यामुळे विविध वृत्तपत्राने दखल घेवुन वृत्त प्रकाशित केले होते. तर स्वत: गर्भवती असताना आधी ४ वेळा ऑपरेशन झालेल्या महिला रुग्णाचे ३ तास शस्त्रक्रिया करुन तिच्या पोटातुन ३ किलो ची गाठ काढली. तर इन्फर्टिलिटी ट्रीटमेंट द्वारे यशस्वी शस्त्रक्रिया करुन एका महिलेने ३ मुलाना जन्म दिला. तर सहा वर्षाच्या मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीला पकडुन देण्यास मदत केल्यामुळे पोलीस क्राइम ब्रँच तर्फे डॉ . रोकडे यांचा सत्कार करण्यात आला होता . एकाच दिवशी २ महिलांच्या पोटातुन २ किलो ची गाठ काढली, तर नुकतेच २८ नोव्हेंबर रोजी लेप्रोस्कॉपीतुन ३ टाक्या द्वारे महिलेच्या पोटातुन अर्धा किलो ची गाठ काढली असुन अशा अवघड शस्त्रक्रिया करुन महिला रुग्णांचे प्राण डॉ . तृप्ती रोकडे यांनी वाचवले आहे . २०१८ पासुन सतत अशा प्रकारच्या विविध अवघड शस्त्रक्रिया करुन शहरासोबत ग्रामीण भागातुन येणाऱ्या गोरगरीब व आदिवासी पेशंट यांच्या अवघड प्रसुती करुन, विभिन्न कँप राबवून कर्तव्य निभावत आहेत. या सर्व कामाची दखल घेत उल्हासनगर अंबरनाथ च्या मराठवाड़ा बहुजन विकास मंच, दशमेश पिता युवा सिख लबाना संघटन, द समर्पण फाउंडेशन, अशोका फाउंडेशन, वृक्ष फाउंडेशन, सिद्धान्त समाज विकास संस्था, मानव विकास सामाजिक सेवा संस्था, आदर्श आदिवासी विकास व शैक्षणिक संस्था, सिमरन सामाजिक संस्था, प्रबल संघटन, सोहम फाउंडेशन, जसोता मैया फाउंडेशन व उल्हासनगर मुस्लिम कब्रस्तान समिती यांच्या कडुन उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयाचे मुख्य शल्य चिकित्सक डॉ मनोहर बनसोडे यांच्या उपस्थितीत डॉ तृप्ती रोकडे व मध्यवर्ती रुग्णालयाचे अन्य डॉक्टर कर्मचारी यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

# देवरूख पुर येथील ग्रामस्थांचा आ.शेखर निकम यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये जाहीर प्रवेश




चिपळुण/प्रतिनीधी: नागपूर अधिवेशन समाप्तीनंतर मतदार संघात दाखल होताच आमदार श्री.शेखर निकम सर यांनी पक्षप्रवेशाचा धडाका पुन्हा सुरू केला आहे.आज देवरुख पूर येथील शेकडो ग्रामस्थांनी आमदार श्री.निकम यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे.या प्रवेशाने देवरुख राष्ट्रवादीला चांगलेच बळ मिळाले आहे.

गावागावात सुरू असलेली विकासकामे आणि मतदारांच्या सुखदु:खात सहभागी होत मतदारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी वाडीवस्तीवर जात असल्याने मतदारांनी झुकते माप आमदार श्री.शेखर निकम सर यांच्या पारड्यात टाकले असल्याचे दिसत असून यातूनच मोठ्या संख्येने कार्यकर्ते राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करू लागले आहेत. आज देवरुख पूर येथील शेकडो ग्रामस्थानी आमदार श्री.शेखर निकम यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला आहे.

यामध्ये रामचंद्र झेपले,महेश झेपले,चंद्रकांत झेपले,हनुमंत घुणे,संतोष भोसले,माजी सरपंच संजय झेपले,तेजस झेपले,योगेश झेपले,सौरभ झेपले,ग्रा.पं सदस्य पूजा झेपले,संध्या झेपले,सविता झेपले,कविता फुगे,ग्रा.पं सदस्य तबसून खाचे,वरद झेपले,स्वाती झेपले,मनोहर झेपले,वासुदेव घुने,रविना झेपले,अनिता झेपले,ममता झेपले आदी सह शेकडो ग्रामस्थांनी आज राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी राष्ट्रवादी देवरुख तालुका उपाध्यक्ष श्री.अमित जाधव यांच्या नेतृत्वाखाली या साऱ्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे.यावेळी ओबीसी सेल अध्यक्ष श्री.दिलीप गोवळकर उपस्थित होते.

यावेळी आमदार श्री.शेखर निकम यांनी या साऱ्यांचे आभार व्यक्त करताना म्हटले की तुम्ही विश्वासाने माझ्यासोबत आला आहात विकासाची कामे होतच राहणार आहेत मात्र आपण आपले एक कुटूंब म्हणून गावाच्या विकासासाठी काम करूया असे आवाहन त्यांनी यावेळी केले.




डॉ बी आर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड आणि भारतीय धम्म महासंघ बीड द्वारा राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांना स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन करताना आयु अडव्होकेट चंद्रवदन जाधव, एस एम जोगदंड, सुरेश कांबळे आणि बी एम जोगदंड. प्रस्तुत प्रसंगी आयु चंद्रवदन जाधव यांनी राष्ट्रीय संत गाडगेबाबा आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील जिव्हाळ्याचे संबंधातील आठवणींना उजाळा दिला.

## गोपाळबुवा सार्वजनिक ग्रंथालयात रविवारी दिवाळी अंकांचे प्रदर्शन व गुणवंतांचा सत्कार

लातूर :- औसा तालुक्यातील माळकोंडजी येथील गोपाळबुवा सार्वजनिक ग्रंथालयाच्या वतीने रविवार,दि.२४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाळी अंकांचे प्रदर्शन आणि गुणवंतांचा सत्कार असा संयुक्त कार्यक्रम आयोजिला असून,दिवाळी अंक प्रदर्शनाचे डॉ.नागोराव कुंभार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. सदरील कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय माहिती सहाय्यक संचालक शाम टरके,जिल्हा ग्रंथालय निरीक्षक हरिश्चंद्र डेंगळे हे उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी धाराशीवच्या नगर वाचनालयाचे माजी ग्रंथपाल, ग्रंथमित्र दशरथ क्षीरसागर,ज्येष्ठ कथाकार जी.जी.कांबळे,तसेच इयत्ता दहावी-बारावीमध्ये गुणानुक्रमे प्रथम आलेले गुणवंत विद्यार्थी तसेच सन २०२२-२३ दरम्यान रुजू झालेल्या कर्मचार्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. तरी सदरील कार्यक्रमाला माळकोंडजी पंचक्रोशीतील साहित्य,शिक्षण क्षेत्रासह वाचन प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन गोपाळबुवा सार्वजनिक ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रकाश विभूते,उपाध्यक्ष सोपान कांबळे, सचिव पांडुरंग अडसुळे, कोषाध्यक्ष विठ्ठल अडसुळे, सदस्य ज्ञानोबा क्षीरसागर,मारुती बरडे, आनंद आडसुळे,ग्रंथपाल शिवलींग अडसुळे,लिपिक राम अडसुळे आदिंनी केले आहे.

# निर्भिड पत्रकारीता समाजाचा आरसा असतो...

उल्हासनगर : निर्भिड पत्रकारिता करुन समाजाला न्याय मिळवुन देण्याचे काम पत्रकार करत असतात. त्यामुळे पत्रकारिता ही समाजाचा आरसा असल्याचे मत सेंच्युरी रेयॉन कंपनीचे (एच. आर.प्रमुख) श्रीकांत गोरे यांनी काल कंपनीच्या क्लब हाऊस मध्ये आयोजित केलेल्या पत्रकार स्नेहसंमेलनात मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

उल्हासनगर कँप १ येथील शहाड जवळ असलेल्या सेंच्युरी रेयॉन कंपनीच्या क्लब हाऊस सभागृहात दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा पत्रकारांसाठी स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी श्रीकांत गोरे हे मार्गदर्शन करताना बोलत होते.ते पुढे म्हणाले की पत्रकारांनी खरी बाजु समजावून घेऊन ती जसीच्या तसी समाजापुढे माडली पाहिजे , त्यामुळे समाजाला न्याय मिळतो. आणि ते काम आपण इमानदारीने करत आहात हयाचा मला सार्थ अभिमान आहे. जेव्हा जेव्हा कंपनीमध्ये समस्या निर्माण होतात त्या त्यावेळी पत्रकारांनी कंपनीला नेहमीच सहकार्य दिले आहे.असेच सहकार्य या पुढे ही कंपनीला राहु द्या असे आवाहन ही श्रीकांत गोरे यांनी पत्रकारांना केले आहे. यावेळी सेच्युरी रेयॉन कंपनीचे (डी.एच.)प्रकाश देसाई यांनीही आपले विचार व्यक्त केले.तर दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा पत्रकार बाधव स्नेहसंमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.पत्रकारांकडुन कंपनीला नेहमी सहकार्य असते असेच सहकार्य यापुढे ठेवण्याचे आवाहन कंपनीचे जनसंपर्क अधिकारी मेहूल लालका यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

# दामू नगर कांदिवली पूर्वे कडील अखेर बंद बस डेपो बनतोय दारुड्या,जुगारबाज, गर्दुल्ले नशा खोर यांचा अड्डा. पोलिसांचे दुर्लक्ष?

मुंबई /शहामत शेख :- समता नगर पोलिस ठाणे हद्दीतील कांदिवली पूर्वेकडील दामू नगर हा भाग येतो. येथील बंद बस डेपो जागा बेस्ट यांचे नावे आरक्षित आहे. मधल्या काही वर्षा पूर्वी हा बस डेपो सुरळीत चालू होता.भिम नगर दामू नगर येथील सन १९९८ सन २००० कालावधीत वनविभाग नावा खाली पक्की घरे तोडण्यात आले. तेथील स्थानिक रहिवाशी इतरत्र ठिकाणी स्थलांतर झाले. यामुळे तेथील प्रवाशाची आवक घटली. या कारणास्तव बस डेपो सेवा बंद करण्यात आले. ही जागा खुल्ले मैदान असल्याने तेथे रात्री अपरात्री व दिवसा दारुडे,जुगारबाज,गर्दुल्ले नाशाखोर यांचा कायमस्वरूपी अड्डा बनला आहे. येथे स्थानिक तरुण मुले, शाळकरी विद्यार्थी दिवसा जुगार ,मटका खेळण्यासाठी एकत्र येतात, रात्र होताच दारुडे,नशाखोर गर्दुल्ले याची मैफिल रंगते. कित्येकदा काही टोळकी तुंबड नशेत असल्याने मुख्य रस्त्यावर येऊन हाणामारी, शिवीगाळ करतात. या त्रासाला तेथे स्थानिक रहिवासी कंटाळले आहेत . रात्री अपरात्री कामावरून घरी परतणाऱ्या लोकांना याचा नाहक त्रास सोसावा लागतो.कित्येकदा लुटा लुटीचे प्रकार सुद्धा घडतात. रात्री उशिरा ये -जा करणाऱ्यांना भीतीचे सावट निर्माण





झाले आहे. परंतु पोलिसातर्फे कसलीच कारवाई केली जात नाही. यामुळे नशाखोर जुगारबाज गर्दुल्ले यांना अधिक बळ मिळते.बंद बस डेपो लगतंच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा आहे. या भागात दारुड्यांचा व नशाखोर यांचा हौदास वाढल्याने तेथे असुरक्षितचे प्रमाण वाढले आहे .येथे रात्री पोलिसांचा गस्त वाढवण्यात यावा, व योग्य ती कारवाई व्हावी.अशी मागणी जनतेतून होत आहे. अन्यथा वंचित बहुजन युवा आघाडी उत्तर मुंबई जिल्हा सचिव व पत्रकार शहामत शेख व यांच्या पक्षांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा गर्भित इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी

लातूर : प्रतिनिधी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय आणि लातूर ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी जिल्हा क्रीडा संकुल येथे ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य शिबीर घेण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिराचे उद्घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे यांच्या हस्ते झाले.ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आर. बी. जोशी, दक्षिण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. बी. आर. पाटील, ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव प्रकाश घादगीने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बरुरे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरास ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उच्च रक्तदाब, मधुमेह रक्ताच्या सर्व तपासण्या मौखिक तपासणी, नेत्र तपासणी मानसिक आरोग्य विषयी मार्गदर्शन, वयोवृद्धांसाठी योग्य आहार कसा असावा व तंबाखूच्या व्यसनांमुळे होणा-या आजार या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.शिबिर यशस्वी होण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी डॉ. भाग्योदय बरेवाड, डॉ. सचिन कोकणे, डॉ. सोनाली केंद्रे, आर. जी. कुलकर्णी, डॉ. माधुरी उटीकर, श्रीमती शेंडगे, अनिल वाठोरे, प्रकाश बेंबरे, अण्णाराव कुंभारे, दीपक पवार, राजाभाऊ घुले, कृष्णा राठोड, संध्याराणी सोमवंशी, संध्या शेडोळे, कैलास स्वामी, दीपक कांबळे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक सारडा यांनी केले. तसेच सूत्रसंचालन अण्णाराव कुंभारे यांनी केले. डॉ. आनंद कलमे यांनी आभार मानले.

# लातूर बाजारपेठेत भाजीपाल्याची ८६४ टनांची आवक

लातूर : प्रतिनिधी येथील महात्मा फुले मार्केट यार्डात आज पुन्हा भाजीपाल्याची आवक कमालीची घटली. आजच्या सौध्यासाठी अवघ्या ८६४ टन भाजीपाल्याची आवक झाली आहे. त्यामुळे भाजी मंडईतील भाजीपाल्याची आवक कमी होत चाल्याने स्थानिक नागरीकांची गरज भागविणेही मुश्कील झाले. लातूर मंडईत लातूर जिल्हयासह शेजारी जिल्हयातून तसेच आदी भागांतून भाजीपाल्याची आवक होते. गेल्या काही दिवसापूर्वी पडलेल्या अवकाळी पाउसामुळे भाजीपाल्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे बाजारात येणारा भाजीपाल्यांची आवक कमी प्रमाणात होत असल्याचे व्यापारी वर्गानी सागीतले आहे.या आवकरळी पावसाच्या नुकसानीमुळे लातूर बाजार समीतीमध्ये होणारी पालेभाज्यांची आवक सरासरीने तूलनेत घसरत चालली आहे. त्यामुळे घाउक बाजारात सध्या भाज्यांच्या दरामध्ये दुप्पट तिप्पट वाढ करून किरकोळ विक्रीते आपला खिसा भरत असल्याचे दिसून येत आहेत. मात्र गेल्या काही दिवसापासून लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीत निगालेल्या पालेभाज्यांच्या दरात खरेदी केलेली भाजीपाला किरकोळ बाजारात दुप्पट तिप्पट दरात विक्री होत आहे. शहरातील महात्मा फुले मार्केट यार्डात भाज्यांची आवक कमी झाली असली तरी किरकोळ विक्रीते दरात वाढ करुन भाजीपाला विकत असल्याने सर्वसामान्यांचे बजेट आता कामडले आहे.लातूर जिल्हयासह विविध भागातील शेतक-यांनी यंदा मोठया प्रमाणात पालेभाज्यांची लागवड केली हाती. काही दिवस भाजीपाल्याचे उत्पादनही मोठया प्रमाणात झाल्याने विविध कृषी उत्पन्न बाजारपेठेत शेतक-याना चागला दरही



मिळाला होता. भाजारपेठेत येणा-या भाजीच्या आवाकीमुळे भाज्यांचे दर कडाडल्याचे पाहायला मिळले हाते. परिणामी, मागील महिन्यात पडलेल्या आवकाळी पाउसामुळे सर्व भाजीपाल्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने सध्या लातूर बाजारपेठेत पालेभाज्यांची आवक मंदावली आहे. अजून काही दिवस अशी परीस्थिती राहील असेही व्यापा-यानी एकमतशी बालताना सागीतले आहे.किरकोळ बाजारात पालेभाज्यांच्या दरात दुप्पट तिप्पट वाढ करुन विक्री करण्यात येत आहे. यात काकडी ५० ते ६० रुपये किलो, गवारी ७० ते ८० रुपये किलो, भेंडी ६० रुपये किलो, कारले ६० रुपये किलो, पत्तागोभी ४० ते ५० रुपये किलो, मिरची ८० ते ९० रुपये किलो, शेपु ३० ते ३५ रुपये पेंडी, वागें ५० ते ६० रुपये किलो, शेवगा ९० ते १०० रुपये किलो, मेथी २० ते ३० रुपये पेंडी, कडिपत्ता २० रुपये किलो, दोडका ५० ते ६० रुपये किलो, शिमला मिरची ६० ते ७० रुपये किलो, लिंबू ९० रुपये किलो, अदरक १७० ते २०० रुपये किलो, कोथीबिर ३० ते ४० रुपये किलो, टोमॅटो ४० ते ५० रुपये किलो, गाजर ५० रुपये किलो, फुलगोभी ५० रुपये किलो, बटाटा ५० ते ६० रुपये किलो, कांदा पाथ ३० रुपये पेंडी, काळे वागें ६० ते ७० रुपये किलो, वरणा ७० रुपये किलो, गावरान वागें ४० ते ५० रुपये प्रतिकिलो प्रमाणे किरकोळ बाजारात विक्री केली जात आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE